# १३. मोठी आई

आपली आई आपल्यावर किती माया करते. खाऊपिऊ घालते. पोटाशी घेते. गोष्टी सांगते. किती छान असते आपली आई!

या आईहून एक मोठी आई आहे. तीदेखील किती छान आहे! तिने तुम्हां-आम्हांला लागणारी प्रत्येक गोष्ट तयार केली आहे. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात दिली आहे. हे जेवणाचे ताट पाहा. यातला प्रत्येक जिन्नस मोठी आई होती म्हणून मिळाला आहे. तुम्ही राहता ते घर, त्याला लागणारे लाकूड, दगडसुद्धा त्या आईने दिले. कोण बरे अशी ही मोठी आई? तिचे नाव भूमी! जमीन!

जमिनीत काय आहे? माती. हीच का ती आई? तुम्ही म्हणाल-खरेच ते. मातीच आहे जमिनीत; पण मातीला तुम्ही कमी समजू नका. माती आहे म्हणूनच आपण जिवंत आहोत.



जेवणाच्या ताटातला प्रत्येक जिन्नस मोठ्या आईने दिला, म्हणजेच तो जमिनीतून निर्माण झाला. गव्हाची पोळी, जोंधळ्याची भाकरी, तांदळाचा भात! गहू, तांदूळ व जोंधळे कोठे तयार होतात? शेतातच ना! पाटी-पेन्सिलीचे मऊ दगडही जमिनीतच सापडतात.

चहाची साखर घ्या. ती उसापासून करतात; पण ऊस उगवतो कोठे? जमिनीत. रॉकेल कुठे सापडते? जमिनीतल्या खाणीत. केळी, कवठे, पेरू, आंबे, नारळ, द्राक्षे, फणस इत्यादी तुम्हांला आवडणारी फळे जमिनीमुळे मिळतात. जमीन नसती तर यांतला एकही जिन्नस मिळाला नसता. साऱ्या भाज्या, जगातील सारी फुले, औषधांची सगळी झाडे जमिनीतूनच जीव धरून वाढतात. आहे ना आपली आई मोठी?



तुम्ही वापरता ते कपडे पाहा. हे सुताचे आणि रेशमाचे आहेत. सूत कशाचे असते? कापसाचे. कापूस कोठून मिळतो? कपाशीच्या झाडापासून. रेशीम कोठून मिळते? रेशमाचे किडे असतात. तुतीच्या झाडावर ते जगतात. ही कापसाची व तुतीची झाडे जमिनीतच वाढतात. जमीनच प्रत्येक जिन्नस निर्माण करते हे तुम्हांला यावरून कळून येईल.



चांदी, रुपे, पितळ, तांबे या सगळ्यांच्या खाणी मोठ्या आईच्या पोटात सापडतात. पितळ, तांबे, कथील नसते, तर आपण भांडी कशाची केली असती? सोने, रुपे नसते तर दागिने कसे मिळाले असते?



एवढेच नाही! अजून ऐका. या मोठ्या आईच्या पोटात लोखंड व दगडी कोळसा यांच्याही प्रचंड खाणी आहेत. लोखंड व कोळसा यांमुळे तर प्रत्येक गिरणी अन् प्रत्येक कारखाना चालतो. कारखाने नसते, तर लोखंडी खुर्च्या व पलंग मिळाले नसते. सुया, टाचण्या, चाकू, कात्र्या, गुंड्या, काचेचे सामान, मोटारी, आगगाड्या, विमाने इत्यादी सगळे सगळे बनलेच



नसते, लोखंड आणि कोळसा नसता तर! सांगा, या दोन गोष्टी देणारी आई मोठी नव्हे काय?

आता घराबद्दल पाहाल तरी तेच उत्तर द्यावे लागेल. तुमचे घर कशाचे बांधले आहे? दगड, माती, विटा, चुना अन् लाकूड यांचे. घराला लाकडाचे खांब, दारे, खिडक्या आहेत. दाराच्या कड्या, तुळया व बिजागऱ्या लोखंडी आहेत.



यातील दगडमाती जमिनीतूनच आणली गेली. विटा कशाच्या आहेत? लाल मातीच्या. लाल माती कोठून आणली? जमिनीतून. चुना कुठे मिळतो? जमिनीत चुनखडीचे खडक असतात. चुना या खडकांपासून तयार करतात. लाकूड कोठून आणले? मोठमोठ्या रानांतील वाळलेली प्रचंड झाडे तोडून हे आणले. दाराला लोखंडाच्या बिजागऱ्या, कड्या, कुलुपे, खिळे बसवले आहेत. हे लोखंडही भूमातेच्या पोटातच सापडते.

तुम्ही कोणतीही गोष्ट घ्या. जमिनीमुळे ती मिळालेली आहे. हे तुमच्या आता लक्षात आलेच असेल!

तुम्ही दूध-दही-तूप खाता! गाई-म्हशींपासून हे आपण मिळवतो; पण या गाई-म्हशी जगतात कशावर? गवत व कडबा यांवर. हे कोण त्यांना देते? आपली मोठी आई.

जगात जी जी सुंदर गोष्ट दिसते ती अशा प्रकारे मोठ्या आईपासून उत्पन्न झालेली आहे. जगलेली आहे व वाढलेली आहे!

ती तुम्हांला अन्न-वस्त्र देते, दागिने देते, घरदार देते, धनधान्य देते, भांडीकुंडी देते, चहासाखर, पाटीपेन्सिल देते, सगळे सगळे देते. त्या मोठ्या आईचे केवढे उपकार मानले पाहिजेत! अन् मग अशी जी जमीन किंवा धरणीमाता तिचे छोटेसे रूप म्हणजे आपली मातृभूमी! त्या भूमीतले अन्न खाऊनच आपण मोठे झालो, शहाणे झालो. माणसांना प्रत्येक गोष्ट दिली ती या भूमीनेच. त्या मायभूमीबद्दल आपण मनात नेहमी प्रेमभाव बाळगावयास नको का?

आपली मोठी आई म्हणजेच आपली मायभूमी!

**- मालतीबाई दांडेकर**

**शब्दार्थ:** **जिन्नस** - वस्तू. **तुळया** - लोखंडाच्या जाड सळया. **कडबा** - कणसे कापून घेऊन उरलेला गुरांना खाण्याचा भाग, वैरण. **मातृभूमी** - जन्मभूमी. **प्रेमभाव बाळगणे** - प्रेम असणे.



## स्वाध्याय

**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) घर बांधण्यासाठी कोणकोणत्या वस्तू लागतात?
(आ) जमिनीच्या पोटात कोणकोणती खनिजे सापडतात?
(इ) कारखान्यात धातूपासून कोणकोणत्या वस्तू तयार होतात?
(ई) चुना कशापासून तयार करतात?
(उ) लेखिकेच्या मते मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगावा?

प्र. २. तुम्ही खात असलेल्या अन्नपदार्थांतील कोणकोणत्या वस्तू जमिनीकडून मिळतात, त्यांची यादी बनवा.

प्र. ३. आपण मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगायला हवा ते तुमच्या शब्दांत लिहा.

प्र. ४. 'मोठी आई' साठी पाठात वापरले गेलेले शब्द शोधा व लिहा.

प्र. ५. 'पाटीपेन्सिल' सारखे जोडशब्द पाठातून शोधून लिहा.

प्र. ६. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

(अ) मातृभूमी – (इ) वस्त्र –

(आ) माया – (ई) आई –

प्र. ७. हे शब्द असेच लिहा.

जिन्नस, भूमी, रॉकेल, निर्माण, प्रचंड, प्रत्येक, खुर्च्या, कात्र्या, गुंड्या, तुळया, गोष्ट, उत्पन्न, कृपेने, वस्त्र, मातृभूमी, कड्या, म्हशी, अन्न, पेन्सिल, प्रेमभाव, टाचण्या, साऱ्या, धनधान्य, द्राक्षे.

प्र. ८. खालील पदार्थ कशापासून बनतात ते लिहा.

उदा., साखर–ऊस.

(अ) फुटाणे – (उ) वेफर्स –

(आ) मनुके – (ऊ) सॉस –

(इ) भाकरी – (ए) सरबत –

(ई) चपाती – (ऐ) चिक्की –

प्र. ९. खालील शब्दांचे अनेकवचन लिहा.

(अ) तुळई – (इ) दागिना –

(आ) बिजागरी – (ई) कवठ –

(इ) झाड – (उ) माती –

प्र. १०. खालील तक्ता भरा.

| अ. क्र. | मनुष्याचे खाद्य | घरबांधणीला उपयुक्त वस्तू | विविध खनिजे | प्राण्यांचे खाद्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |


प्र. ११. शेतात पीक यावे म्हणून शेतकरी कोणकोणती कामे करतो? त्या कामांची यादी करा.

प्र. १२. खालील तक्ता पूर्ण करा.


| लोखंडी वस्तू | काचेच्या वस्तू | लाकडी वस्तू | मातीच्या वस्तू |
|---|---|---|---|
| | | | |

प्र. १३. जमिनीच्या खाली येणारी पिके व जमिनीच्या वर येणारी पिके यांची माहिती करून घ्या. त्यांची यादी तयार करा.

**प्र. १४. खालील वस्तूंपासून तुमच्या घरी कोणकोणते पदार्थ तयार केले जातात. याविषयी आपापसांत गप्पा मारा.**




**प्र. १५. मोठ्या आईपासून प्राप्त होणाऱ्या गोष्टी लिहून आकृती पूर्ण करा.**




**उपक्रम :** आई, मातृभूमी या विषयावरील कवितांचा संग्रह करून त्या कवितांचे वर्गात वाचन करा.

**प्रकल्प :** शिक्षक किंवा पालकांच्या मदतीने जवळच्या शेताला भेट द्या. शेतात येणाऱ्या विविध पिकांचे निरीक्षण करून शेतातील अन्नधान्याबद्दल माहिती मिळवा.

- **खालील वाक्यांत ( ? ! '–' ''–'' . ,) घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) आवडले का तुला पुस्तक आई म्हणाली.

(आ) तो प्रामाणिक आहे बाबांनी सांगितले.

(इ) गणू म्हणाला अग आई उद्या सुट्टी आहे असे दिनूने सांगितले म्हणून मी शाळेत गेलो नाही

(ई) अहाहा किती छान चित्र आहे

(उ) तुला लाडू आवडतो का

(ऊ) माझे काका मुंबईला राहतात

(ए) मधू राजा रझिया व मारिया गप्पा मारत बसले

**वाचा.**

दिनेशने सोसायटीत प्रवेश केला. सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळ लावलेल्या फळ्यावर सुविचार लिहिला होता. 'प्रत्येक मानवाची गरज पूर्ण करण्यास निसर्ग समर्थ आहे; त्याला कोणतीही हाव नाही.' दिनेश विचार करू लागला, 'या सुविचारातून निसर्गाचे किती वास्तव स्वरूप दाखवले आहे.'

निसर्गातील प्रत्येक घटकाला देणे माहीत आहे, घेणे नाही. झाडे, वेली, पाने, फुले, नद्या, पर्वत, डोंगर, पशु, पक्षी, माती, चंद्र, सूर्य, तारे... निसर्गातील असे अनेक घटक आपले जीवन सुखकर व्हावे म्हणून मदतीला असतात. आपल्याला निसर्गाला काही देता आले नाही तर देऊ नये; पण त्याच्याकडून काही ओरबडून घेऊ नये. निसर्ग आपला मित्र आहे. आपण त्याचे मित्र का बनू नये ?